महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डीआरए-०५२२/प्र.क्र.१५५/२०२२/जाहिरात दिनांक: ०४ जानेवारी, २०२३

**-: शुध्दीपत्रक :-**

**विषय : सहायक संचालक, (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण), गट-अ**

**संदर्भ : (१) जाहिरात क्रमांक-०३६/२०२२**

**(२) विषयांकीत संवर्गाच्या जाहिरातीस अनुसरुन दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजीचे शुध्दीपत्रक**

शासनाच्या, गृह विभागाच्या मागणीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक संचालक, (संगणक गुन्हे, ध्वनी व ध्वनीफित विश्लेषण), गट-अ या संवर्गातील ०५ पदांच्या भरतीकरीता दिनांक १४ एप्रिल, २०२२ रोजी जाहिरात (जाहिरात क्रमांक ०३६/२०२२) प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि, शासनाच्या, गृह विभागाकडून दिनांक ३१ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने प्राप्त अभिप्रायानुसार, जाहिरातीमधील अनुभवाच्या संदर्भात दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले होते. सदर शुध्दीपत्रकान्वये प्रयोगशाळांच्या नावांबाबतच्या बदलामुळे अर्हताप्राप्त उमेदवारांना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येत असून जाहिरात क्रमांक ०३६/२०२२ ला अनुसरुन अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | **अर्ज सादर करावयाचा कालावधी** | **दिनांक ०५ जानेवारी, २०२३ रोजी १४.०० ते दिनांक ०९ जानेवारी, २०२३ रोजी २३.५९** |
| २ | **ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक ०९ जानेवारी, २०२३ रोजी २३.५९** |
| ३ | **भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेणे याकरीता विहित अंतिम दिनांक** | **दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी २३.५९** |
| ४ | **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी २३.५९** |

**२.** जाहिरात क्रमांक ०३६/२०२२ नुसार विहित पध्दतीने अर्ज केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

**३.** मूळ जाहिरातीमधील वयोमर्यादा तसेच शैक्षणिक अर्हता आणि अनुभव कालावधी मूळ जाहिरातीमध्ये नमूद दिनांकानुसारच गणण्यात येईल.

**४.** अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र ग्राह्य समजण्यात येईल.

**५.** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या-१२, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ अनुसार दिनांक १ मार्च, २०२० ते दिनांक १७ डिसेंबर, २०२१ या कालावधीत वयाधिक ठरणारे उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

**६.** जाहिरातींमधील इतर अटी व तरतुदींमध्ये कोणताही बदल नाही.

**७.** सदर शुध्दीपत्रक तसेच मूळ जाहिरात क्रमांक ०३६/२०२२ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई.

(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.
(२) प्रमाणपत्र तपासणीच्या वेळी पात्रतेसंदर्भातील सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास शिफारस/नियुक्तीसाठी विचार करण्यात येणार नाही.